महाराष्ट्र शासन	Government of Maharashtra
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, विस्तार इमारत, सातवा मजला , मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.	General Administration Department, Mantralaya, Annexe Building, Seventh floor, Madame Cama Road,Hutatma Rajguru Chowk, Mumbai ४०० ०३२.

क्रमांक : विचासं- १११९/ प्र. क्र. २१ / २८-अ, दिनांक : ८ ऑगस्ट, २०१९

विषय :- महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या हवाई हवानांच्या लँडींग/पार्कींग दि.४/६/२०१७ ते १९/१/२०१८ या कालावधीच्या प्रलंबित देयकांच्या प्रदानास मंजुरी देण्याबाबत.

ज्ञापन:-

अधिदान व लेखा अधिकारी यांना कळविण्यात येते की, शासनाच्या मालकीच्या सेसना सायकटेशन ५६० एक्सएलएस व्हीटी- व्हीडीडी या विमानाच्या व हेलिकॉप्टर व्हीटी सीएमएम या हवाई वाहनांचे मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील लँडींग व पार्कींग संदर्भातील देयके मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा. लिमिटेड या कंपनीने विलंबाने (एक वर्षाचा कालावधी झाल्यानंतर) सादर केले आहे. सदर देयकाची एकूण रक्कम रु. १४,६२,०९९/- (रुपये चौदा लाख बासष्ट हजार नव्याण्णव फक्त) मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लिमिटेड यांना अदा करण्यास विमानचालन संचालनालय, मुंबई यांना शासन मंजूरी देत आहे.

२. या प्रित्यर्थचा खर्च खाली नमूद केलेल्या लेखीशीर्षांतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र. ए-४
२०७०- इतर प्रशासनिक सेवा
(११४) परिवहन साधनांची खरेदी व परिरक्षण
(००) (०२) विमानचालन सल्लागार, महाराष्ट्र शासन
(२०७००१५६) ५० इतर खर्च

३. सदर बाबीसाठी संचालक,विमानचालन संचालनालय यांना नियंत्रक अधिकारी व उपसंचालक, विमानचालन संचालनालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. हे ज्ञापन शासन निर्णय वित्त विभाग विअतप्र-२००१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग-एक मधील अनुक्रमांक ६ नियम क्रमांक ४० अन्वये प्रशासनिक विभागांना प्राप्त झालेल्या प्राधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१९०८०८१७१६४६७३०७ असा आहे .हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

BHARAT BUDHAJI GAWADE

Digitally signed by BHARAT BUDHAJI GAWADE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=bc303d0b23c9b2e64564546661363400c4a360e6c6fbdefca273e2f5d2a43be7, postalCode=400032, street=MANTRALAYA MUMBAI,
serialNumber=af4e3993e4dd3610fcb21aece361e641ad3d33d96f04d57673c4fca72eb10c92, ou=GAD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
cn=BHARAT BUDHAJI GAWADE
Date: 2019.08.08 17:26:12 +05'30'

(भ.बु.गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक / उप संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई.
२. मॅनेजर, मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड, मुंबई ४०० ०९९
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६. निवड नस्ती.